# षड्रिपूंतील लक्ष्मणरेषा

श्रीमद् नामचैतन्य भानुदास
दि. १७-११-२००९
दैनिक सकाळ, मुंबई यांच्या सौजन्याने

आज आपण 'षड्रिपूंतील लक्ष्मणरेषा' ढोबळमानाने समजावून घेऊ. ही रिपूंतील लक्ष्मणरेषा अतिशय धूसर आहे. षड्रिपूंशिवाय संसारी आणि व्यवहारी जीवन जगणं अशक्य आहे. हे षड्रिपू काही प्रमाणात जीवनावश्यक वाटत असले तरी त्यांचा अतिरेक मात्र निश्चितच क्लेशदायक ठरतो. त्यासाठीच अध्यात्म–विज्ञानाने प्रत्येक रिपूंत लक्ष्मणरेषा आखून दिली आहे. त्यामुळे अर्थातच हे षड्रिपू त्याज्य आणि व्यवहार्य अशा दोन भागात विभागले गेलेत. त्याज्य रिपू हे अतिरेकी रिपू असल्यामुळे त्यांचा ठरवून त्याग करणं आवश्यक असतं. जागरूकपणे थोडे प्रयत्न केले तर त्याज्य रिपूंवर मात करणं शक्य असतं, हे माझ्या संपर्कात असलेल्या शेकडो व्यक्तींनी अनुभवलेलं आहे. त्याज्य रिपूंच्या भावनात्मक प्रेरणा जर सतत मनात उत्पन्न होत राहिल्या, तर त्याचा मनावर एवढा परिणाम होतो, की त्या व्यक्तीचा तो स्वभाव म्हणूनच ओळखला जातो. अशा स्वभावांच्या व्यक्ती कधीच सुखी समाधानी राहू शकत नाहीत. त्या व्यक्ती स्वत:ला क्लेश तर करून घेतातच पण दुसऱ्यालाही त्या व्यक्ती तापदायक ठरतात. सोबत दिलेल्या तक्त्याच्या आधारे व्यवहार्य रिपूंचा विचार करता असं लक्षात येईल, की हे रिपू व्यवहार आणि संसारासाठी आवश्यकच ठरतात. षड्रिपूंवर सखोल विचार करत असताना आणखी एक गोष्ट प्रकर्षाने समोर आली. ज्याप्रमाणे चुंबकांच्या विरुद्ध धृवांमध्ये आकर्षण असतं, तर समान धृवांमध्ये प्रतिकर्षण असतं, त्याचप्रमाणे या रिपूंमध्येही आकर्षण–प्रतिकर्षण असतं. मात्र ते चुंबकीय गुणधर्मांच्या नेमकं उलट असतं. समान विचारसरणीच्या व्यक्ती एक दुसऱ्याकडे आकृष्ट होतात, तर मतभिन्नता असलेल्या व्यक्ती एक दुसऱ्यापासून मनाने दूर जातात. षड्रिपूंचाच विचार करायचा झाला तर असं लक्षात येईल, की मोह, लोभ आणि काम या रिपूंमध्ये आकर्षण असतं, तर मत्सर, दंभ आणि क्रोध या रिपूंमध्ये प्रतिकर्षण असतं. मोहात आवडणाऱ्या गोष्टीकडे, लोभात द्रव्याकडे तर कामात भिन्नलिंगीयांमध्ये आकर्षण असतं. जिच्याविषयी मत्सर वाटतो त्या व्यक्तीला मनाने दूर ठेवलं जातं, तर दंभात इतरेजनांपासून माणूस स्वत:ला वेगळं समजतो. क्रोधातल्या प्रतिकर्षणाविषयी तर सांगायलाच नको. त्याज्य आणि व्यवहार्य रिपूंतील फरक उदाहरणांसह आपण या सदरात यापुढे पाहणार आहोत.

**षड्रिपूंतील लक्ष्मणरेषा**

| रिपू | त्याज्य । व्यवहार्य |
|---|---|
| काम | कामासक्ती । संभोग |
| क्रोध | संताप । राग |
| लोभ | द्रव्यासक्ती । द्रव्यार्जन |
| मोह | आसक्ती । आकर्षण |
| दंभ | गर्व । अभिमान |
| मत्सर | द्वेष । हेवा |